**।। प्रेसनोट ।।** दि.२१/०६/२०१८

**जागतिक योग दिन २१ जुन २०१८ साजरा केले बाबत.....**

**'२१ जुन जागतिक योगा दिना निमित्त'** पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचेवतीने गुरूवार दि.२१/०६/२०१८ रोजी सकाळी ०६/०० ते ०७/३० वा. पर्यंत पोलीस परेड मैदान, पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे याठिकाणी **'योगा शिबीर'** आयोजीत करण्यात आले होते.

या प्रसंगी श्री.साहेबराव पाटील, अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),पुणे शहर यांनी प्रमुख पाहुणे योग प्राचार्य श्री.प्रमोद निफाडकर,कैवल्यधाम,श्रीमन माधव योग मंदिर समिती,लोणावळा व त्यांचे इतर सहकारी यांना क्रार्यक्रमाचे सुरूवातीस पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे योग प्राचार्य यांनी योग साधनेचे थोडक्यात महत्व सांगितले व त्यांचेसोबत कैवल्यधाम,श्रीमन माधव योग मंदिर समिती,लोणावळा येथुन आलेले ११ योग प्रशिक्षकांनी प्रात्यक्षिके करून दाखविले. त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी योगासने केली.

सदर कार्यक्रमास श्री.रविंद्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त,(दक्षिण),पुणे श्री.शेषराव सुर्यवंशी,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-२,पणे शहर यांचेसह ०६ पोलीस उप-आयुक्त, १० सहा. पोलीस आयुकत, ८० पोलीस निरीक्षक, सहा.पोलीस निरीक्षक, पो.उप-निरीक्षक व ६८४ महिला व पुरूष कर्मचारी यांनी जागतिक योग दिना दिवशी मोठया प्रमाणात योग शिबीराचा लाभ घेतला.

तसेच मा.श्री.शेषराव सुर्यवंशी,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-२ यांनी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

**टिप :-** सदर कार्यक्रमाचे फोटो कार्यक्रमाचे फोटो crimepress.pune@gov.in या ई-मेल आयडी व https://punepolice.co.in या वेबसाईटवर पाठविली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर


जागतिक योग दिन
दि. २१ जून २०१८
पुणे शहर पोलीस









